ee५
e९५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे ०१/८/२०२२.
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२६
दिनांक : ०१.०८.२०२२

## अफ्रिकन शिष्टमंडळाची बेस्ट उपक्रमास भेट

मुंबई, ०१ - गेल्या वर्षभराच्या आधीपासून बेस्ट उपक्रमाने बसताफा वाढवण्याच्या दृष्टीने, प्रवाशांना सार्वजनिक परिवहन उपक्रमाकडे आकर्षित करण्यासाठी तसेच स्वत:चे अस्तित्व अबाधित ठेवण्याच्या उद्देशाने विविध योजना आणि उपक्रम राबविले. इलेक्ट्रिक बस, डिजिटल तिकीट प्रणाली, एनसीएमसी कार्ड, टॅप इन टॅप आऊट सेवा इंटेलिजंट ट्रान्सपोर्ट मॅनेजमेंट सिस्टिम, मोबाईल ॲप, हेरीटेज बससेवा आणि महिला विशेष सेवा अशा विविध उपक्रमांचा लाभ प्रवाशांना होत आहे. सदर उपक्रम आणि योजना केवळ प्रवाशांमध्येच लोकप्रिय होत आहेत असे नाही, तर दिल्ली परिवहन मंडळ, तेलंगणा राज्य मार्ग परिवहन मंडळ, केरळ राज्य मार्ग परिवहन मंडळ यासारख्या इतर राज्य मार्ग परिवहन उपक्रमांचे अधिकारी देखील बेस्ट उपक्रमाला भेट देऊन सदर उपक्रम आणि योजनांचा अभ्यास करीत आहेत, जेणेकरुन त्यांची अंमलबजावणी त्यांच्या संस्थांमधून करता येईल.

अलीकडेच दिल्ली राज्याचे परिवहन मंत्री मा.श्री. कैलाश गहलोत यांनी देखील बेस्ट उपक्रमाला भेट देऊन बेस्टच्या विविध योजनांची माहिती घेतली. त्याचप्रमाणे केरळ राज्य मार्ग परिवहन मंडळ आणि तेलंगणा राज्य मार्ग परिवहन मंडळाच्या अधिका-यांनी इलेक्ट्रिक बस प्रवर्तन आणि डिजिटल तिकीट प्रणालीचा अभ्यास करण्यासाठी बेस्ट उपक्रमाला भेट दिली. केरळ राज्य मार्ग परिवहन मंडळाद्वारे त्रिवेंद्रममध्ये हेरीटेज बसगाडया सुरु करण्याविषयी नियोजन करण्याचा विचार आहे.

इलेक्ट्रिक दळणवळणाबाबत माहितीपूर्ण अभ्यास करण्याच्या उद्देशाने अफिक्रेतील सहा नगर प्रशासनांच्या एका शिष्टमंडळाने आज १ ऑगस्ट २०२२ रोजी बेस्टच्या इलेक्ट्रिक बस प्रवर्तन आणि डिजिटल तिकीट प्रण.लीचा सखोल अभ्यास करण्यासाठी भेट दिली. सदर उपक्रमाची अंमलबजावणी अफ्रिकेतील सहा महापालिकांमध्ये करण्याचे नियोजन विचाराधीन आहे. या शिष्टमंडळामध्ये केनिया, युगांडा, दक्षिण अफ्रिका, रवांडा, सेचिलीस आणि कोटडिल्वोयर येथील वरिष्ठ अधिका-यांचा समावेश आहे.

.....

Scanned with OKEN Scanner

eeu
e34

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक,
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

मनोज वराडे २/८/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२७
दिनांक : ०२.०८.२०२२

मुंबई,०२- स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व बेस्टच्या महापालिकाकरणाचा अमृत महोत्सवाचा एक भाग म्हणून बेस्टची एक रुपयांत पाच प्रवासांचा 'बेस्ट आजादी ' योजना

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने बेस्टच्या महापालिकाकरणाच्या अमृत महोत्सवी वर्षात बेस्ट उपक्रमाने फक्त एका रुपयांत 'बेस्ट आजादी ' योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत चलो ॲपचा पहिल्यांदा वापर करणाऱ्या नव्या प्रवाशांना सात दिवसांचा बसपास केवळ एक रुपयांत डाऊनलोड करता येईल , ज्यामध्ये त्यांना वातानुकूलित किंवा विना वातानुकूलित बसमध्ये सांत दिवसांत कितीही अंतराच्या पाच फेऱ्यांचा लाभ घेता येईल. सदर सवलत दिनांक १५ ऑगस्ट २०२२ पर्यत लागू राहील.

बेस्टच्या डिजिटायझेशनचा भाग म्हणून काही महिन्यापूर्वीच बेस्ट उपक्रमामध्ये **डिजिटल तिकीट प्रणाली** सुरु करण्यात आली होती. या **डिजिटल तिकीट प्रणाली** अंतर्गत प्रवाशांना तिकीट आणि बसपास खरेदी करिता **मोबाईल** तिकिटिंग **ॲप- 'बेस्ट चलो ॲप '** आणि बेस्ट चलो एनसीएमसी कार्डचा प्रारंभ करण्यात आला होता. सध्याच्या ३३ लाख दैनंदिन प्रवाशांपैकी २२ लाख प्रवासी **चलो** ॲपचा वापर करतात आणि ३.५ लाख प्रवासी **डिजिटल तिकीट** प्रणालीचा वापर करतात. भारतामध्ये बेस्ट ही एकमेव परिवहन सेवा आहे, जेथे प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड उपयोगांत आणले आहे.

डिजिटल पेमेंटला चालना देण्याच्या उद्देशाने बेस्ट आजादी बसपास योजना घोषित करण्यात आली आहे. मुंबईकर , विशेषतः नव्याने **ॲप**चा वापर करणाऱ्यांना या नवीन योजनेचा फायदा होणार असून त्याद्वारे बेस्ट बसमधील डिजिटल प्रणालीचा वापर वाढणार आहे. हा बेस्ट बसमधील तिकीट खरेदी करण्याचा अतिशय सुलभ मार्ग आहे. मुंबईकरांना जागतिक डिजिटल तिकीट प्रणालीचा अनुभव देणे ही, या पास योजनेमागील कल्पना आहे. डिजिटल बस योजनेला देखील सध्या वाढती मागणी आहे. बेस्टचा १०० हून अधिक डिजिटल बसेस मध्ये टॅप इन आणि टॅप आऊट प्रणाली कार्यान्वित आहे. आता तिकिटांसाठी रांगेत उभे राहावे लागत नसल्याने प्रवाश्यांना प्रवास करणे सोयीचे झाले आहे. तसेच ज्या लोकांना स्मार्ट कार्ड्स/ एनसीएमसी कार्डचा वापर करावयाचा असेल अशा प्रवाशांना २०/- रु. ची सवलत दिली जाते. ही सवलत देखील दिनांक १५ ऑगस्ट २०२२ पर्यत लागू राहणार आहे.

तरी सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त मुंबईकर प्रवाशांनी घ्यावा असे बेस्ट उपक्रमाद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

------------

Scanned with OKEN Scanner

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिकेचा अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२, मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक,
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.२८
दिनांक : ०३.०८.२०२२

## 'बेस्ट' चे नवे सहायक महाव्यवस्थापक (विद्युत पुरवठा)

मुंबई, ०३ - बेस्ट उपक्रमाचे सहायक महाव्यवस्थापक (विद्युत पुरवठा) म्हणून श्री. नितीन हेर्लेकर यांची नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे. श्री हेर्लेकर यांनी विद्युत अभियांत्रिकीमधील पदवी संपादन केली असून १९८९ साली बेस्ट उपक्रमामध्ये उप अभियंता या पदावर ते रुजू झाले होते.

यापूर्वी त्यांनी बेस्ट उपक्रमाच्या प्रवर्तन व परिरक्षण, उभारणी, ग्राहकसेवा, नियोजन (जालव्यूह), ऊर्जा लेखा परीक्षण, संगणक समयोजिकता, दक्षता (विद्युत पुरवठा) व विद्युत पुरवठा कार्यालय इत्यादी विभागांमध्ये विविध पदांवर काम केले आहे.

.......

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंगीकृत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र १९२,
मुंबई - ४०० ००१.

संपादक / वृत्तसंपादक

कृपया प्रसिद्धीकरिता सादर

(सुरेश गायकवाड)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिद्धी पत्रक क्र २९
दिनांक : ०४.०८.२०२२

## 'पार्क +' या मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल 'वॅले पार्किंग' आणि 'स्वयं पार्किंग'

मुंबई, ४ - दि.७ ऑगस्ट २०२२ रोजी बेस्ट उपक्रमाच्या महापालिकाकरणाला ७५ वर्षे होत असून बेस्ट उपक्रमातर्फे 'अमृतमहोत्सव' साजरा करण्यात येत आहे. बेस्ट उपक्रमाकरीता हा अतिशय आनंददायी क्षण असून या निमित्ताने उपक्रमाच्यावतीने मुंबईकरांकरीता विविध योजना सादर करण्यात येत आहेत.

मुंबईतील रस्त्यावरील अनधिकृत पार्किंग कमी करून 'रस्ते' वाहतुकीला मोकळे होण्याकरीता बेस्ट उपक्रमाने सन २०१९ पासून 'पे ॲण्ड पार्क' ही योजना सुरु केलेली आहे. या योजनेअंतर्गत दिवसा उपक्रमाच्या बसगाड्या बसमार्गांवर प्रवर्तित होत असल्याने बेस्ट बसआगार व बसस्थानकांमधून रिकाम्या जागी खाजगी वाहनधारकांना त्यांची वाहने 'पार्क' करण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. या योजनेला मुंबईतील वाहनधारकांनी समाधानकारक प्रतिसाद दर्शविलेला आहे. अमृतमहोत्सवी 'बेस्ट दिना'चे औचित्य साधून दि.७ ऑगस्ट २०२२ पासून 'पे ॲण्ड पार्क' योजनेचे संगणकीकरण करण्यात येत आहे. तसेच 'वॅले पार्किंग' ही नवीन संकल्पना देखील सुरु करण्यात येत आहे.

'परवीओम टेक्नोलॉजिज प्रा.लि.' ज्या कंपनीला 'पार्क +' या नावाने ओळखण्यात येते, त्या कंपनीच्या माध्यमातून या योजनेचे संगणकीकरण करण्यात येत आहे.

'पार्क +' ॲपच्या सहाय्याने वाहनधारकांना मुंबईतील बेस्ट उपक्रमाच्या बसआगार व बसस्थानकांमधे पार्किंगकरीता उपलब्ध असलेल्या जागेबाबत माहिती सहजगत्या प्राप्त होवू शकेल. यामुळे वाहनधारक त्यांना हवे असलेल्या ठिकाणी आगाऊ जागा आरक्षित करून घेऊ शकतात. परिणामी अखेरच्याक्षणी वाहनांकरीता जागा 'न' मिळाल्यामुळे होणारी गैरसोय टळू शकते. तसेच 'पार्क +' ॲपमुळे वाहनधारक डिजिटल पध्दतीने पार्किंग शुल्काचा भरणा करू शकतो. ज्यामुळे रोख रक्कम हाताळण्याची जोखीम कमी होवू शकते. शिवाय उपक्रमाच्या आगारात वाहन असल्यामुळे सुरक्षिततेची जास्त हमी राहते.

...२

या संगणकीकृत योजनेअंतर्गत पुढीलप्रमाणे दोन पध्दतीने पार्किंग सुविधा घेता येईल.

१. **स्वयं पार्किंग** – या पध्दतीमध्ये वाहनधारक स्वत: त्याचे / तिचे वाहन बसआगार / बसस्थानकामध्ये 'पार्क' करतील. याकरीता पुढीलप्रमाणे पार्किंग शुल्क आकारण्यात येईल

| वाहनांचा प्रकार | ३ तासापर्यंत | ६ तासापर्यंत | १२ तासापर्यंत | १२ तासांपेक्षा जास्त | १२ तासांकरिता (मासिक) | २४ तासांकरिता (मासिक) |
|---|---|---|---|---|---|---|
| दुचाकी | २० | २५ | ३० | ३५ | ६६० | १३२० |
| तीन चाकी/चार चाकी | ३० | ४० | ७० | ८० | १००० | ३०८० |
| रिक्षा/टॅक्सी | ३० | ४० | ७० | ८० | १००० | ३०८० |
| ट्रक/टेम्पो | ५५ | ९० | १६५ | २०५ | ३६३० | ७२६० |
| बस | ६० | ९५ | १७५ | २१५ | २००० | ३७०० |
| शाळेची बस | ६० | ९५ | १७५ | २१५ | २००० | २००० |

* 'पार्क +' ॲपच्या माध्यमातून जागा आरक्षित करण्याकरीता 'प्लॅटफॉर्म शुल्क' रु.५/- अतिरिक्त आकारण्यात येईल

२. **वॅले पार्किंग** – या पध्दतीमध्ये वाहनधारक बसआगाराच्या प्रवेशद्वारावर वाहन सोडतील व तेथून सदर वाहन आगारात 'पार्क' करण्याची व्यवस्था बेस्ट / 'पार्क +' च्यावतीने करण्यात येईल. सुरुवातीला ही व्यवस्था कुलाबा, मुंबई सेंट्रल वरळी, दिंडोशी आणि वांद्रे या ५ बसआगारांमध्ये सुरु करण्यात येईल. या पध्दतीमध्ये शुल्क आकारणी पुढीलप्रमाणे राहिल.

| | |
|---|---|
| दोन तासांपर्यंत | रु.१००/- (कोणत्याही प्रकारच्या वाहनाकरीता) |
| दोन तासानंतर | प्रत्येक तास अथवा त्याच्या भागाकरीता रु.३०/- अतिरिक्त |

मुंबईकरांनी विशेषत: वाहनधारकांनी मुंबईतील जागेच्या समस्येमुळे आपले वाहन 'पार्किंग' करण्याकरीता जागा मिळत नसल्याने होणारा मन:स्ताप टाळण्यासाठी 'पार्क +' या ॲपच्या माध्यमातून बेस्ट उपक्रमाच्या 'वॅले पार्किंग' आणि 'स्वयं पार्किंग' योजनेमध्ये आपल्या वाहनाकरीता आगाऊ जागा आरक्षित करावी आणि आपला अमूल्य वेळ वाचवावा असे आवाहन मुंबईतील वाहनधारकांना बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

=====

Scanned with OKEN Scanner

संपादक/वृत्तसंपादक,
कृपया प्रसिद्धीकरिता सादर

मसुदाडे
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ३०
दि. ०८ ऑगस्ट २०२२

## मुंबई शहरामध्ये "HOP ON-HOP OFF-HO-HO" वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बससेवा

मुंबई ०८ - दिनांक ७ ऑगस्ट २०२२ रोजी बेस्ट उपक्रमाच्या महापालिकाकरणाला ७५ वर्षे होत असून बेस्ट उपक्रमातर्फे 'अमृतमहोत्सव' साजरा करण्यात येत आहे. बेस्ट उपक्रमाकरिता हा अतिशय आनंददायी क्षण असून या निमित्ताने उपक्रमाच्या वतीने मुंबईकरांकरिता विविध योजना सादर करण्यात येत आहेत.

मुंबई शहरामध्ये येणाऱ्या पर्यटकांना सुरक्षित आणि किफायतशीर बससेवा पुरवण्याबाबतच्या दृष्टीकोनातून उपक्रमाने Hop On - Hop Off म्हणजेच "Ho-Ho" वातानुकूलित इलेक्ट्रिक पर्यटन बससेवा सकाळी ९ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या ठिकाणाहून दर एक तासाच्या अंतराने कार्यान्वित करण्याचा निर्णय घेतला आहे. या बससेवेचे पर्यटन शुल्क प्रति व्यक्ती प्रति बसफेरी सर्व करांसहित १५० रुपये असून पर्यटकाने एखाद्या पर्यटनस्थळी बसगाडीतून उतरून त्या स्थळाची पाहणी केल्यानंतर पुढच्या फेरीच्या बसगाडीतून पुढील पर्यटन स्थळापर्यंत प्रवास करू शकतात. पर्यटकांना सदर बससेवेव्यतिरिक्त बेस्ट उपक्रमाच्या इतर बसमार्गांचा वापर करून देखील मुंबईतील प्रेक्षणीय स्थळे पाहता येतील.

सदर Ho-Ho बससेवा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून प्रवर्तित होऊन म्युझियम, गेट वे ऑफ इंडिया, मरीन ड्राईव्ह, बाबुलनाथ, पेडर रोड, हाजी अली, महालक्ष्मी रेस कोर्स, धोबी घाट (महालक्ष्मी स्थानक), जिजामाता उद्यान मार्गे जे. जे. उड्डाण पुलावरून पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस अशी चालविण्यात येणार आहे.

तरी सर्व पर्यटक, मुंबईकरांनी या किफायतशीर बससेवेचा लाभ घेऊन पर्यटनाचा मनमुराद आनंद लुटावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

---x---

१००८४

संपादक / वृत्त संपादक
कृपया प्रसिद्धीकरिता सादर

मधुकर (स्वाक्षरी)
७/८/२०२२
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

**बेस्ट**
**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ३१
दि. ७ ऑगस्ट २०२२

## बेस्ट उपक्रमाचा अमृत महोत्सव

मुंबई - ७, ७ ऑगस्ट १९४७ रोजी महापालिकाकरण झालेला 'बेस्ट उपक्रम' आज आपला अमृत महोत्सव साजरा करीत आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात बेस्ट उपक्रमाचा अमृत महोत्सव साजरा होणे म्हणजे एक दुग्ध शर्करा योगच म्हणावा लागेल.

'कार्यक्षम सेवेची अखंड परंपरा' हे ब्रीदवाक्य सार्थ ठरवणारी बेस्ट तेव्हाप्रमाणेच वीज पुरवठा आणि परिवहन या दोन अत्यावश्यक सेवा मुंबईकरांना पुरवते.

१) आजपासूनच मुंबई शहरात सकाळी ९ ते रात्री ८ पर्यंत मुंबई शहरात दुसरी Hop On - Hop Off इलेक्ट्रिक वातानुकूलित पर्यटन बससेवा सुरू करण्यात आली आहे.

२) बेस्ट उपक्रमाच्या ऐतिहासिक वस्तू व उपक्रमाची कार्यप्रणाली-प्रगती दर्शवणारे भव्य प्रदर्शन - ८ आणि ९ ऑगस्ट २०२२, सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत, पु.ल. देशपांडे प्रदर्शन हॉल, रविंद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी

३) बेस्टमधील रांगोळीकारांचे भव्य रांगोळी प्रदर्शन - ८ ऑगस्ट ते १३ ऑगस्ट २०२२, सकाळी ११ ते सायंकाळी ७ पर्यंत, रविंद्र नाट्य मंदिर संकुल, प्रभादेवी, मुंबई - ४०००२५.

४) भारतातील पहिली सार्वजनिक परिवहन केंद्रित प्रदान प्रणाली 'चलो पे' ही मोबाईलवर आधारित सेवा बेस्ट चलो मोबाईल ॲपच्या आधारे कार्यान्वित करण्यात येत आहे. ज्यामध्ये प्रवासी कमी कालावधीत सेवा पुरवठादार निवडण्याची सोय आहे. 'युपीआय' द्वारे सदर मोबाईल वॉलेट रिचार्ज करता येईल त्याचप्रमाणे नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड, इतर ऑनलाईन पद्धतीचा देखील वापर करता येईल. क्यू आर कोड स्कॅन करून देखील तिकिट खरेदी करता येईल.

---

Scanned with OKEN Scanner

१११५

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पो.पेटी क्र.१९२, मुंबई - ४००००१

प्रसिध्दी पत्रक क्र.३२
दिनांक : १४.०८.२०२२

**बेस्ट उपक्रमाचा दैनंदिन बसपास "CHALO" मोबाईल ॲप आणि "CHALO" स्मार्टकार्डच्या माध्यमातून वितरीत करणेबाबत.**

मुंबई, १२ - बेस्ट उपक्रमाने "CHALO" या मोबाईल ॲप च्या माध्यमातून संपूर्ण तिकीट वितरण यंत्रणेचे अद्ययावतीकरण केलेले आहे. या प्रणालीअंतर्गत इलेक्ट्रॉनिक तिकीट इश्युइंग मशीनमध्ये (ETIM) रोख रकमेच्या सहाय्याने नियमित तिकीट / बसपास वितरणाबरोबरच, "CHALO" स्मार्टकार्ड आणि भ्रमणध्वनीच्या माध्यमातून तिकीट / बसपास वितरणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत उपक्रमाच्या बसगाडयांमधून प्रवास करणा-या प्रवाशांना प्रवास अंतरावर आधारीत 'सुपर सेव्हर' बसपास उपलब्ध आहेत. तसेच उपक्रमाच्या संपूर्ण बसप्रवर्तनावर अमर्याद प्रवासाची सुविधा असलेले 'मॅजिक' बसपास देखील उपलब्ध करण्यात आलेले आहेत. शिवाय दैनंदिन प्रवासाकरिता अमर्याद प्रवासाची सुविधा असलेला सर्वसाधारण बसमार्गांवर रु.५०/- मुल्यवर्गाचा आणि वातानुकूलित बसमार्गांवर रु.६०/- मुल्यवर्गाचा बसपास उपलब्ध करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत हे दोन्ही बसपास रोख रकमेचा भरणा केल्यावर बसवाहकाकडील ETIM मधून वितरीत करण्यात येतात.

सोमवार दि.१५ ऑगस्ट २०२२ पासून दैनंदिन बसपासचे वितरण "CHALO" मोबाईल ॲप आणि "CHALO" स्मार्टकार्डच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. याअंतर्गत प्रवाशांनी "CHALO" मोबाईल ॲपची सुविधा घेऊन त्याद्वारे मोबाईलच्या माध्यमातून दैनंदिन बसपास प्रवाशांना उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच ज्या प्रवाशांना "CHALO" मोबाईल ॲपच्या माध्यमातून ही सुविधा घ्यावयाची नसेल त्यांना "CHALO" स्मार्टकार्डच्या माध्यमातून ही सुविधा घेता येईल.

...२...

Scanned with OKEN Scanner

"CHALO" स्मार्टकार्डच्या माध्यमातून दैनंदिन बसपासची सुविधा घेताना 'सुपर सेव्हर' अथवा 'मॅजिक' बसपास कार्यरत असलेल्या स्मार्टकार्डमधून ही सुविधा घेता येणार नाही. मात्र, या बसपासचा कालावधी संपल्यानंतर सदर स्मार्टकार्डमधून दैनंदिन बसपासची सुविधा घेता येईल. तसेच वॅलेटची तरतूद असलेल्या "CHALO" स्मार्टकार्डमधून देखील दैनंदिन बसपासची सुविधा घेता येईल. यापैकी कोणत्याही "CHALO" स्मार्टकार्डची तरतूद ज्यांच्याकडे नाही, तसेच "CHALO" मोबाईल ॲप देखील ज्या प्रवाशांकडे नाही, अशा प्रवाशांना दैनंदिन बसपासकरीता बसवाहकांकडून वेगळे "CHALO" स्मार्टकार्ड घ्यावे लागेल.

दैनंदिन प्रवासादरम्यान बसवाहककाकडे स्मार्टकार्ड सुपूर्द करुन त्यांना हवा असलेल्या सर्वसाधारण अथवा वातानुकूलित बसपासच्या अनुषंगाने रकमेचा भरणा डिजिटल अथवा रोख स्वरुपात केल्यानंतर बसवाहक दैनंदिन बसपासची पावती प्रवाशाला सुपूर्द करतील. त्यानंतर प्रत्येक बसफेरीच्या वेळी प्रवाशाने त्याचे स्मार्टकार्ड बसमार्गावरील बसवाहककाकडे सुपूर्द केल्यानंतर बसवाहक ETIM वर सदर स्मार्टकार्ड टॅप करुन वैध (Valid) करतील. हा दैनंदिन बसपास रात्रौ १२.०० वा. पर्यंत वैध राहील.

उपक्रमाच्या बसगाडयांमधून प्रवास करणा-या प्रवाशांनी दैनंदिन बसपास वितरणातील या बदलाची नोंद घेऊन दैनंदिन प्रवासाकरीता "CHALO" स्मार्टकार्डचा वापर करावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

=====

Scanned with OKEN Scanner

९९५५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

प्रमुवराडे १९/८/२०२२

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३३
दिनांक : १९.०८.२०२२

## पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता बेस्ट उपक्रमातर्फे सवलतीच्या दरातील बसपास योजना

मुंबई, १९ - पदवीपर्यंतचे शिक्षण घेत असणा-या विद्यार्थ्यांकरिता बेस्ट उपक्रमातर्फे सवलतीच्या दरातील बसपास योजना घोषित करण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि बेस्टच्या महापालिकाकरणाचा अमृत महोत्सव या अनुषंगाने सदर योजना म्हणजे विद्यार्थ्यांना देण्यात आलेली एक बक्षीस आहे. या योजनेअंतर्गत १२ वी पर्यंतचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना ६४९ रुपये किमतीचा १०० बसफे-यांचा बसपास ३५० रुपयांच्या सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहे. १०५०/- रुपयांचा तिमाही बसपास आणि अर्धवार्षिक मुदतीचा १७५०/- रुपयांचा बसपास देखील उपलब्ध आहे.

पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी १०० फे-यांचा ९९९/- रुपयांचा मासिक बसपास ५००/- रुपये सवलतीच्या दरात उपलब्ध होणार असून तिमाही बसपास १५००/- रुपये आणि अर्धवार्षिक बसपास २५००/- रुपये इतक्या किमतीला उपलब्ध आहेत.

त्याचप्रमाणे १० वी पर्यंतचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना बेस्ट उपक्रमाद्वारे पुढीलप्रमाणे सवलतीचे बसपास उपलब्ध आहेत.

| इयत्ता | मासिक | तिमाही | अर्धवार्षिक |
|---|---|---|---|
| ५ वी पर्यंत | २०० | ६०० | १००० |
| ६ वी ते ९ वी पर्यंत | २५० | ७५० | १२५० |

अलीकडेच झालेल्या बेस्ट उपक्रमाच्या कार्यक्रमामध्ये मान.मुख्यमंत्री,महाराष्ट्र सरकार यांनी घोषणा केल्याप्रमाणे पदवीपर्यंतचे शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना सवलतीचे बसपास देण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाकडून घेण्यात आलेला आहे.

सदर सवलतीच्या दरातील बसपास दिनांक २२.०८.२०२२ पासून देण्यात येणार आहेत. विद्यार्थी 'बेस्ट चलो ॲप' च्या माध्यमातून ऑन लाईन अर्ज करु शकतात किंवा जवळच्या बेस्ट आगारातून स्मार्ट कार्ड घेऊ शकतात.

बेस्टचे महाव्यवस्थापक श्री. लोकेश चंद्र यांनी असे सांगितले की, सदर योजनेमुळे विद्यार्थ्यांना लाभ होणार असून सदर योजना सार्वजनिक परिवहन बससेवा वापरण्याकरिता प्रोत्साहन देणारी आहे.

- - - -

Scanned with OKEN Scanner

१९८५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२, मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मनुवराडे
२३/८/२०२२

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३४
दिनांक : २३.०८.२०२२

## गणेशोत्सवाच्या दरम्यान विशेष बससेवेचे प्रवर्तन

मुंबई, २३ – दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ ते ८ सप्टेंबर २०२२ या गणेशोत्सवाच्या कालावधी दरम्यान गणेशभक्तांना मुंबईतील विविध ठिकाणी भेट देणे सोयीस्कर व्हावे, या दृष्टीने बेस्ट उपक्रमाने रात्रीच्या वेळेस २५ विशेष बसगाडयांचे प्रवर्तन करण्याचे ठरविले आहे.

या विशेष बससेवेचे प्रवर्तन खालील बसमार्गांवर रात्री ११.०० वा. ते सकाळी ६.०० वा. या कालावधीमध्ये दर एक तासाच्या प्रस्थानांतराने केले जाईल.

| अनु क्र. | बसमार्ग क्र. | प्रस्थान | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १. | १ मर्या. | इलेक्ट्रिक हाऊस / कुलाबा आगार | बांद्रा रेक्लेमेशन बसस्थानक |
| २. | ४ मर्या. | ओशिवरा आगार | सर जे.जे.रुग्णालय |
| ३. | ७ मर्या. | विक्रोळी आगार | सर जे.जे.रुग्णालय |
| ४. | ८ मर्या. | शिवाजी नगर | सर जे.जे.रुग्णालय |
| ५. | ६६ मर्या. | राणी लक्ष्मीबाई चौक | कुलाबा आगार |
| ६. | २०२ मर्या. | माहीम बसस्थानक | बोरीवली स्थानक (पश्चिम) |
| ७. | सी-३०२ | राणी लक्ष्मीबाई चौक | महाराणा प्रताप चौक (मुलुंड) |
| ८. | सी-३०५ | बॅकबे आगार | धारावी आगार |
| ९. | सी-४४० | माहीम बसस्थानक | बोरीवली स्थानक (पूर्व) |

वरील बसमार्गांवर प्रवाशांच्या मागणीनुसार अधिक बस चालविल्या जातील. प्रवाशांना विनंती करण्यात येते की, गणेशोत्सवाच्या दरम्यान विविध गणेशोत्सवाच्या ठिकाणी भेट देण्याकरिता या विशेष सार्वजनिक बससेवेचा लाभ घ्यावा.

गणेशोत्सवाच्या दरम्यान सुरक्षित, किफायतशीर व पर्यावरणपूरक सार्वजनिक बससेवेचा जास्तीत जास्त वापर करण्यासाठी आम्ही मुंबईकरांना प्रोत्साहित करीत आहोत, असे महाव्यवस्थापक, श्री. लोकेश चंद्र म्हणाले.

......

Scanned with OKEN Scanner

२२३५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३५
दिनांक : २३.०८.२०२२

## डिजिटल प्रदान केलेल्या डिजिटल बसमधून प्रवास करणा-या (टॅप इन – टॅप आऊट बससेवा )प्रवाशांना गर्दीच्या वेळेत प्राधान्याने प्रवेश

मुंबई, २३ - डिजिटायझेशन प्रक्रियेला व डिजिटल तिकीट पध्दतीस चालना देण्याच्या हेतूने बेस्ट उपक्रमाने बेस्ट चलो ॲप, स्मार्ट कार्ड बसपास आणि एन.सी.एम.सी.सह बसपास योजनांचा शुभारंभ केलेला आहे. अडथळामुक्त प्रवासासाठी बेस्ट उपक्रमाने सर्वप्रथम १००% डिजिटल (टॅप इन - टॅप आऊट ) बससेवेचा देखील प्रारंभ केलेला आहे.

बेस्ट उपक्रमाने ए-७७, ए-१०२, ए-१०५, ए-११२, ए-११५, ए-११६, ए-११८, ए-१२३, ए-१६२, ए-१६७, ए-३६१, ए-३७८, ए-४०१, ए-४०२, ए-विशेष ८ आणि ए-विशेष ९ अशा एकूण १६ बसमार्गांवर सुमारे २०० बसगाडयांमधून टॅप इन - टॅप आऊट बससेवा सुरु केलेली आहे.

फक्त बेस्ट चलो ॲप आणि स्मार्ट कार्ड वापरणा-या प्रवाशांना रांगेत वाट न पाहता अशा डिजिटल बससेवेमधून गर्दीच्या वेळेतही प्रवास करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे.

सुमारे २५ लाख बेस्ट चलो ॲपचा वापर करणारे आणि ४ लाखाहून अधिक डिजिटल तिकीट पध्दतीचा अवलंब करणारे प्रवासी आहेत, त्यामुळे बेस्ट उपक्रम डिजिटायझेशनच्या बाबतीत संपूर्ण भारतातील प्रथम क्रमांकाची शहर परिवहन संस्था बनली आहे.

‘ जास्तीत जास्त प्रवाशांना अडथळयाविना जागतिक दर्जाचा अनुभव देण्याच्या उद्देशाने आम्ही डिजिटल बससेवांचे लोकार्पण केले आहे. केवळ १ रुपयात प्रवास या ‘बेस्टच्या आझादी योजनेला’ मुंबईकरांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला आहे.’ असे बेस्टचे महाव्यवस्थापक, श्री. लोकेश चंद्र यांनी म्हटले आहे.

१ रुपयात बेस्ट आझादी योजनेअंतर्गत बेस्ट चलो ॲपच्या सहाय्याने प्रवासी सात दिवसात कोणत्याही लांबीच्या बसमार्गावर पाच वेळा बसप्रवास करु शकतात. सदर आझादी योजना दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत सुरु आहे.

=====

Scanned with OKEN Scanner

9204


**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.


कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३६
दिनांक : २३.०८.२०२२

## “ बेस्ट हेरिटेज बससेवेद्वारे गणेश दर्शन ”

मुंबई, २३ - दक्षिण मुंबईतील प्रेक्षणीय स्थळे पाहण्याकरिता बेस्ट उपक्रमाद्वारे खुल्या दुमजली बसद्वारे हेरिटेज टूर बससेवा चालविली जाते.

३१ ऑगस्ट २०२२ ते ८ सप्टेंबर २०२२-या गणेशोत्सव कालावधीदरम्यान दक्षिण मुंबईतील विविध गणपती मंडळांना विशेषत: फोर्ट, गिरगाव, खेतवाडी, लालबाग, भायखळा इत्यादी ठिकाणी रात्रीच्या वेळेस भेट देण्याकरिता ही हेरिटेज टूर बससेवा चालविण्याचे ठरविले आहे.

सदर हेरिटेज दुमजली बसगाडया रात्री १०.०० वा. ते सकाळी ६.०० वा. या वेळेत १ तासाच्या प्रस्थांतराने चालविल्या जातील. या बससेवेची सुरुवात म्युझियम येथून सुरु होऊन गेट वे ऑफ इंडिया, नरिमन पॉइंट, मरिन ड्राइव्ह, चर्चगेट, महर्षि कर्वे रोड, गिरगाव चर्च, प्रार्थना समाज, ताडदेव, मुंबई सेंट्रल, भायखळा, जिजामाता उद्यान, लालबाग आणि परत भायखळा, मुंबई सेंट्रल, ताडदेव, चर्नीरोड, मरिन लाईन्स, मेट्रो सिनेमा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून पुन्हा म्युझियम पर्यंत ही बससेवा हॉप ऑन हॉप ऑफ या पध्दतीने कार्यान्वित असेल. त्या बससेवेसाठी वरच्या व खालच्या मजल्यासाठी अनुक्रमे रु.१५०/- आणि रु. ७५/- असे तिकीट दर असतील.

अधिक माहितीसाठी प्रवाशांनी कृपया बेस्टच्या हेल्पलाईन क्रमांक १८२२ ७५५० (टोल फ्रि) आणि ०२२ – २४१९०११७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

प्रवाशांना विनंती करण्यात येते की, या गणेशोत्सवादरम्यान विविध गणपती मंडळांना भेटी देण्यासाठी सदर हेरिटेज टूर बससेवेचा अवश्य लाभ घ्यावा.

=====

Scanned with OKEN Scanner

9394

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मसुवराडे 24/8/2022
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३७
दिनांक : २४.०८.२०२२

बेस्टची दिव्यांगांकरिता विशेष मोहिम - जुने सवलतीचे
ओळखपत्र / कागदी ओळखपत्र बदली करण्याबाबत

मुंबई, २४ - डिजिटायझेशन प्रक्रियेद्वारे डिजिटल तिकीट पध्दतीस जास्तीत जास्त चालना देण्याच्या हेतूने बेस्ट उपक्रमाने बेस्ट चलो ॲप आणि स्मार्ट कार्ड बसपास, एन सी एम सी सह बसपास योजनांचा शुभारंभ केला आहे. आता बेस्ट उपक्रमाने दिव्यांग व्यक्तींसाठी जुने सवलतीचे ओळखपत्र / कागदी ओळखपत्र बदलण्याचे ठरविले आहे.

सर्व विशेष श्रेणीतील सवलतींसाठी प्रवाशांनी 'बेस्ट चलो ॲप' डाऊनलोड करुन बसपासच्या मान्यतेकरिता ऑनलाईन अर्ज करायचा आहे. ज्यांच्याकडे स्मार्ट फोन उपलब्ध नाहीत, परंतु त्यांना स्मार्ट कार्ड हवे आहे, त्यांच्यासाठी बेस्टने घरपोच कार्ड पोहोचविण्याची विशेष मोहिम हाती घेतली आहे. त्यासाठी कॉल सेंटरकडून विशेष सवलतीच्या पासधारकांना कॉल केला जाईल व जे स्मार्ट कार्ड घेण्यास इच्छुक आहेत त्यांना त्यांच्या पत्त्यावर कुरिअरद्वारे कार्ड पोहचविले जाईल. बेस्टचे कॉल सेंटर २४ x ७ कार्यान्वित रहाणार असून त्याचा क्रमांक १८०० २२७ ५५० (टोल फि) आणि ०२२ – २४१९०११७ असा आहे.

सर्व विशेष श्रेणीतील प्रवाशांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्वरित बेस्ट चलो ॲपद्वारे त्यांचे जुने कार्ड बदली करुन घ्यावे किंवा नवीन स्मार्ट कार्ड घ्यावे. १५ सप्टेंबर २०२२ पासून जुने बसपास अवैध मानले जातील, याची कृपया नोंद घ्यावी.

Scanned with OKEN Scanner

१३५५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मनुवराडे २५/८/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.३८
दिनांक : २५.०८.२०२२

<u>सार्वजनिक गणेशोत्सव २०२२ - गणेश भक्तांकरीता विविध उपक्रम</u>

मुंबई, २५ - मागील दोन वर्षाच्या कोरोना महामारीच्या काळात एकूणच सर्व सार्वजनिक उपक्रमावर निर्बंध होते. परंतु, यंदा गणेशभक्तांचा उत्साह पाहता गणेशोत्सव मंडळे, गणेशभक्त आणि मुंबईकरांच्या सोयीकरीता बेस्ट उपक्रमाने गणेशोत्सवातील विद्युत रोषणाईसाठी तात्पुरता वीज पुरवठा विनाविलंब मिळविण्याकरीता बेस्टच्या संबंधित ग्राहकसेवा विभागात एक खिडकी योजना कार्यान्वित केली आहे.

बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळावरील प्रकाश योजनेची सुरक्षतेच्या दृष्टीने आखणी केलेली आहे. बेस्ट उपक्रमाने गणेशभक्तासाठी ७१ मिरवणूक मार्ग, २० विसर्जन स्थळे आणि ३८ कृत्रिम तलाव येथे २२१५ दिवे लावून प्रकाश योजना केली आहे. विसर्जन स्थळांवर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण १३ स्थायी विद्युत मनो-यांची उभारणी केली आहे. तसेच मोठ्या गर्दीच्या ठिकाणी आपतकालीन परिस्थितीत विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विसर्जन स्थळांवर पर्यायी वीज पुरवठ्याकरीता एकूण ८ डिझेल जनित्र संचांची व्यवस्था करण्यात आली आहे.

समुद्रात विसर्जन करताना आपतकालीन प्रसंग उद्‌भवल्यास बुडणा-यांना वाचविण्यासाठी जीवरक्षक दलास मदत म्हणून समुद्रात खोलवर प्रकाश पोहोचण्यासाठी एकूण १९ उच्च क्षमतेचे स्रोत असलेले शोधप्रकाश (सर्च लाईट ) दिव्यांची व्यवस्था केलेली आहे.

विसर्जन स्थळांवर वीज पुरवठा सुरळीत व विनाखंडीत चालू ठेवण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे.

मुंबई शहर हद्दीत साजरा करण्यात येणा-या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या धर्तीवर दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच मुंबईकरांच्या माहितीसाठी बेस्ट उपक्रमाच्या मार्गप्रकाश विभागामार्फत एक माहिती पुस्तिका गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली.

विद्युत रोषणाईसाठी तात्पुरता वीज पुरवठा मिळवण्यासाठी अर्जदाराने पूर्ण करावयाच्या नियम व अटींच्या सर्व सुचना तसेच बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळावरील प्रकाश योजनेची माहिती तसेच गणेश भक्तांसाठीची बस वाहतूक व्यवस्था यासंदर्भात संपूर्ण माहिती माहितीपुस्तिकेत विस्तृतपणे देण्यात आलेली आहे. सदर पुस्तिका बेस्ट उपक्रमाच्या <u>www.bestundertaking.com</u> च्या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

......

Scanned with OKEN Scanner

# प्रेस नोट

विषय : सार्वजनिक गणेशोत्सव, २०२२ – गणेश भक्तांकरीता विविध उपक्रम

मागील दोन वर्षांच्या कोरोना महामारीच्या काळात एकूणच सर्व सार्वजनिक उपक्रमांवर निर्बंध होते. परंतु यंदा गणेशभक्तांना उत्साह पाहता गणेशोत्सव मंडळे, गणेश भक्त आणि मुंबईकरांच्या सोयीकरीता बेस्ट उपक्रमाने गणेशोत्सवातील विद्युत रोषणाईसाठी तात्पुरता वीज पुरवठा विनाविलंब मिळविण्याकरीता बेस्टच्या संबंधित ग्राहकसेवा विभागात एक खिडकी योजना कार्यान्वित केली आहे.

बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळावरील प्रकाश योजनेची सुरक्षतेच्या दृष्टीने आखणी केलेली आहे. बेस्ट उपक्रमाने गणेशभक्तासाठी ७२ मिरवणूक मार्ग, २० विसर्जन स्थळे आणि ३८ कृत्रिम तलाव येथे २२२५ दिवे लावून प्रकाश योजना केली आहे. विसर्जन स्थळांवर सुयोग्य प्रकाश व्यवस्थेकरीता एकूण १३ स्थायी विद्युत मनोऱ्यांची उभारणी केली आहे. तसेच मोठया गर्दीच्या ठिकाणी आपतकालीन परिस्थितीत विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विसर्जन स्थळांवर पर्यायी वीज पुरवठाकरीता एकूण ८ डिझेल जनित्र संचांची व्यवस्था करण्यात आली आहे.

समुद्रात विसर्जन करताना आपतकालीन प्रसंग उद्भवल्यास बुडणाऱ्यांना वाचविण्यासाठी जीवरक्षक दलास मदत म्हणून समुद्रात खोलवर प्रकाश पोहोचण्यासाठी एकूण १९ उच्च क्षमतेचे झोत असलेले शोधप्रकाश (सर्च लाईट) दिव्यांची व्यवस्था केलेली आहे.

विसर्जन स्थळांवर वीज पुरवठा सुरळीत व विनाखंडीत चालू ठेवण्यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक केलेली आहे.

मुंबई शहर हद्दीत साजरा करण्यात येणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवाच्या धर्तीवर दरवर्षी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच मुंबईकरांच्या माहितीसाठी बेस्ट उपक्रमाच्या मार्गप्रकाश विभागमार्फत एक माहिती पुस्तिका गुरूवार दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी प्रकाशित करण्यात आली.

विद्युत रोषणाईसाठी तात्पुरता वीज पुरवठा मिळण्यासाठी अर्जदाराने पूर्ण करावयाच्या नियम व अटींच्या सर्व सुचना तसेच बेस्टच्या मार्गप्रकाश विभागाने मिरवणूक मार्गावरील व विसर्जनस्थळावरील प्रकाश योजनेची माहिती तसेच गणेश भक्तांसाठीची बस वाहतूक व्यवस्था यासंदर्भात संपूर्ण माहिती माहितीपुस्तिकेत विस्तृतपणे देण्यात आलेली आहे. सदर पुस्तिका बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

---

मसुदा मान्येतकरीता सादर,

सहा. महाव्यवस्थापक(विपु)

महाव्यवस्थापक

Approved by GM.

९३७४

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.३९
दिनांक : २६.०८.२०२२

## टॅप इन – टॅप आऊट बससेवेला प्रवाशांचा वाढता प्रतिसाद
## डिजिटल प्रदान केलेल्या प्रवाशांना डिजिटल बसमधून प्रवास करण्यासाठी प्राधान्याने प्रवेश

मुंबई, २६ - मुंबईकर प्रवाशांच्या वेळेची बचत व्हावी, कोरोना तसेच इतर तत्सम आजारांच्या पार्श्वभूमीवर संपर्कविरहित आणि सुरक्षित बसप्रवास देण्याच्या दृष्टीकोनातून तसेच डिजिटायझेशन प्रक्रियेला व डिजिटल तिकीट पध्दतीस चालना देण्याच्या हेतूने बेस्ट उपक्रमाने बेस्ट चलो ॲप, स्मार्ट कार्ड बसपास आणि एन.सी.एम.सी.सह बसपास योजनांचा शुभारंभ अलिकडेच केलेला आहे. यानंतर अडथळामुक्त प्रवासासाठी बेस्ट उपक्रमाने देशातील सर्वप्रथम अशा १००% डिजिटल टॅप इन - टॅप आऊट बस्सेवेचा देखील प्रारंभ केलेला आहे.

प्रवाशांचा वाढता प्रतिसाद आणि वाढती मागणी लक्षात घेऊन बेस्ट उपक्रमाने ए-७७, ए-१०२, ए-१०५, ए-११२, ए-११५, ए-११६, ए-११८, ए-१२३, ए-१६२, ए-१६७, ए-३६९, ए-३७८, ए-४०१, ए-४०२, ए-विशेष ८ आणि ए-विशेष ९ अशा एकूण १६ बसमार्गांवर सुमारे २०० बसगाडयांमधून टॅप इन - टॅप आऊट बससेवा नुकतीच सुरु केलेली आहे.

बेस्ट चलो ॲप आणि स्मार्ट कार्ड वापरणा-या प्रवाशांना रांगेत वाट न पाहता अशा डिजिटल बससेवेद्वारे गर्दीच्या वेळेतही प्रवास करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे.

३४.५ लक्ष बेस्ट प्रवाशांपैकी आजपर्यंत २५ लाखांहून जास्त प्रवासी बेस्ट चलो ॲपचा वापर करीत असून आणि ४.५ लाखाहून अधिक प्रवासी डिजिटल तिकीट पध्दतीचा अवलंब करीत आहेत, त्यामुळे आज बेस्ट उपक्रम डिजिटायझेशनच्या बाबतीत संपूर्ण भारतातील प्रथम क्रमांकाची शहर परिवहन संस्था बनली आहे आणि भविष्यकाळात जास्तीत जास्त बसगाडया टॅप इन - टॅप आऊट तंत्रज्ञानावर आधारित करण्याचा बेस्ट प्रशासनाचा मानस आहे. डिजीटल तिकीट प्रणालीला चालना देण्यासाठी 'बेस्ट फ्रिडम प्लॅन' ३१ ऑगस्ट २०२२ पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. या योजनेअंतर्गत केवळ १ रुपयामध्ये कोणत्याही बसमार्गावर सात दिवसांच्या आत पाच वेळेला प्रवास करण्याची सोय आहे. तरी, या योजनेचा फायदा जास्तीत जास्त प्रवाशांनी घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.

'प्रवाशांना जागतिक दर्जाच्या प्रवासाचा सुखद अनुभव देण्याच्या दृष्टीने बेस्ट उपक्रमाकडून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग केला जात आहे याचा लाभ सर्वच प्रवाशांनी घ्यावा' असे आवाहन बेस्टचे महाव्यवस्थापक, श्री. लोकेश चंद्र यांनी केले आहे.

=====

Scanned with OKEN Scanner

९३९४

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
**प्रसिध्दी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मसुवराडे 30/8/2022
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.४०
दिनांक : ३०.०८.२०२२

## मुंबईकरांसाठी गणेशोत्सवानिमित्त बेस्ट ऑफर

मुंबई, ३० - गणेश चतुर्थीच्या पूर्व संध्येला बेस्ट उपक्रमाने मुंबईकर जनतेसाठी एक आकर्षक योजना जाहीर केली आहे. यामध्ये बेस्ट चलो ॲप वापरणा-या प्रवाशांना ७९९ रुपयांचा सुपर सेवर प्लॅन केवळ १९९ रुपयांना उपलब्ध होणार आहे म्हणजेच प्रवाशांना ७५% सवलत मिळणार आहे. सदर योजना १४ दिवसांकरिता वैध राहणार असून यामध्ये २० रुपयांच्या ५० फे-यांचा समावेश असणार आहे. जास्तीत जास्त मुंबईकरांना डिजीटल तिकीट प्रणालीकडे आकर्षित करण्याच्या दृष्टीकोनातून सदर योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ बेस्ट चलो ॲप वापरणारे विद्यमान प्रवासी तसेच नवीन प्रवासी या दोघांनाही मिळणार आहे.

**योजनेचा लाभ कसा घ्याल ?**

गुगल प्ले स्टोअर मधून चलो ॲप डाऊनलोड केल्यानंतर बसपास सेक्शनमध्ये जाऊन सदर योजना शोधावी. गणेशोत्सव योजना निवडून प्रवाशांनी त्यांचा तपशील भरुन त्यांचा फोटो अपलोड करावा. डेबिट किंवा क्रेडिट कार्डद्वारे तसेच नेट बँकिग किंवा युपिआयद्वारे १९९ रुपयाचे ऑनलाईन प्रदान करुन प्लान खरेदी करावा.

सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी ‘ Use Now ’ यावर क्लिक करावे. बसमध्ये चढल्यावर ‘Start a Trip’ वर क्लिक करुन तुमचा मोबाईल फोन बसवाहकाच्या तिकीट यंत्राजवळ वैधतेसाठी धरावा. वैधता पूर्ण झाल्यावर प्रवासाकरिता डिजिटल पावती उपलब्ध होईल. ही संपूर्ण प्रक्रिया कॅशलेस आणि पेपरलेस असणार आहे.

...२...

Scanned with OKEN Scanner

**योजनेपासून मिळणारे लाभ –**

सदर योजनेत सहभागी झालेल्या प्रवाशांना १४ दिवसांच्या कालावधीमध्ये ५० फे-यांचा लाभ मिळणार आहे. वातानुकूलित तसेच बिगर वातानुकूलित बसगाडयांमध्ये २० रुपयांपर्यंतच्या सर्व तिकीटांवर प्रवासाची सुविधा उपलब्ध आहे. सदर योजना ३१ ऑगस्ट २०२२ ते १० सप्टेंबर २०२२ या कालावधीत उपलब्ध असणार आहे.

सदर योजना म्हणजे अलिकडेच बेस्ट उपक्रमाने जारी केलेल्या केवळ एका रुपयामध्ये सात दिवसात पाच डिजिटल फे-या या आझादी योजनेप्रमाणे लागू केलेली आणखी एक अमृतमहोत्सवी योजना आहे . दीड लाखांपेक्षा जास्त वापरकर्त्यांनी आझादी योजनेचा लाभ घेतला असून त्यांनी प्रवासाच्या ६.६ लाखांपेक्षा जास्त डिजीटल फे-या पूर्ण केल्या आहेत. सदर आझादी योजनेचे स्वागत मुंबईकर जनतेने भरभरुन केले असून कित्येकजणांनी सदर आझादी योजना समाजमाध्यमांद्वारे इतरांपर्यंत पोहोचविली आहे असे बेस्ट उपक्रमाचे महाव्यवस्थापक श्री.लोकेश चंद्र यांनी सांगितले.

.......

Scanned with OKEN Scanner

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिध्दी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका संचालित)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिध्दी पत्रक क्र.८१
दिनांक : ३०.०८.२०२२

## गणेशोत्सव दरम्यान दिनांक ३१.०८.२०२२ ते ०८.०९.२०२२ या कालावधीमध्ये अतिरिक्त बसेसचे प्रवर्तन

मुंबई, ३० - दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ ते ०९ सप्टेंबर २०२२ या कालावधीत गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. या उत्सवादरम्यान संपूर्ण शहरामध्ये विशेषत: रात्रीच्या वेळेस मध्य व दक्षिण मुंबईमध्ये मोठया प्रमाणात प्रवाशांची वर्दळ सुरु असल्याचे आढळून येते.

बेस्ट उपक्रमाने रात्रीच्या वेळेत प्रवाशांची वाहतूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी दिनांक ३१ ऑगस्ट २०२२ ते ८ सप्टेंबर २०२२ या कालावधीत अतिरिक्त बसेस प्रवर्तित करण्याचे योजले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अनु क्र. | बसमार्ग क्र. | पासून | पर्यंत | एकूण बसेस(एकमजली) | प्रवर्तन कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४ मर्या. | डॉ.एम.इक्बाल चौक | ओशिवरा आगार | ४ | २३.०० वा.ते ६.०० वा. |
| २. | ७ मर्या. | विजय वल्लभ चौक | विक्रोळी आगार | ४ | २३.०० वा.ते ६.०० वा. |
| ३. | ८ मर्या. | डॉ.एम.इक्बाल चौक | शिवाजी नगर टर्मिनस | ४ | २३.०० वा.ते ६.०० वा. |

....२

Scanned with OKEN Scanner

याव्यतिरिक्त गणेश भक्तांच्या सोयीसाठी उपक्रमाद्वारे संपूर्ण रात्रभर नियमितपणे बससेवा कार्यान्वित ठेवली जाणार आहे.

| अनु क्र. | बसमार्ग क्र. | पासून | पर्यंत | प्रवर्तन कालावधी | एकूण बसेस(एकमजली) |
|---|---|---|---|---|---|
| १. | १ | इलेक्ट्रिक हाऊस | बांद्रा रेक्लमेशन बस स्थानक | २४.०० वा.ते ५.०० वा. | २ |
| २. | *६६ मर्या. | इलेक्ट्रिक हाऊस | राणी लक्ष्मीबाई चौक | २४.३० वा.ते ५.३० वा. | ३ |
| ३. | २०२ मर्या. | माहिम बस स्थानक | बोरीवली बस स्थानक (पश्चिम) | २४.०० वा.ते ५.०० वा. | २ |
| ४. | सी-३०२ | राणी लक्ष्मीबाई चौक | महाराणा प्रताप चौक,(मुलुंड) | २४.०० वा.ते ४.०० वा. | २ |
| ५. | सी- ३०५ | बॅकबे आगार | धारावी आगार | २४.०० वा.ते ५.०० वा. | २ |
| ६. | सी-४४० | माहिम बस स्थानक | बोरिवली बस स्थानक | २४.०० वा.ते ५.०० वा. | २ |

*बसमार्ग क्र.६६ मर्यादितवर एक अतिरिक्त बस चालविली जाईल.

तरी सर्व मुंबईकर जनतेने या अतिरिक्त बससेवेचा लाभ अवश्य घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

....

Scanned with OKEN Scanner

१५८५

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिध्दी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र १९२,
मुंबई - ४०० ००१.

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.४२
दिनांक :०८.०९.२०२२

## विमानतळ बससेवेचे बेस्ट चलो ॲपद्वारे आगाऊ तिकीट आरक्षण

मुंबई, ०८ – विमानाने मुंबईला येणा-या प्रवाशांना विमानतळापासून त्यांच्या इच्छित स्थळापर्यंत आरामदायक प्रवास देण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने एअरपोर्ट – १- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) पासून दक्षिण मुंबई / बॅकबे आगार , एअरपोर्ट – २ - छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) पासून जलवायू विहार / खारघर द्वारा पाम बिच रोड आणि एअरपोर्ट – ४- छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) पासून कॅडबरी जंक्शन / ठाणे अशा तीन वातानुकूलित बससेवा इलेक्ट्रिक बसद्वारे सुरु केल्या आहेत.

उद्यापासून म्हणजेच दिनांक ०९.०९.२०२२ पासून बेस्ट चलो ॲपचा वापर करुन तिकीटाचे आगाऊ आरक्षण करुन प्रवासी सदर बससेवेचा लाभ घेऊ शकतात. याकरिता खालील पाच बाबी प्रवाशांना करायच्या आहेत.

१. गुगल प्ले स्टोअरवरुन बेस्ट चलो ॲप डाऊनलोड करावे, त्यानंतर दक्षिण मुंबई / बॅकबेकरिता बसमार्ग क्रमांक ८८१, वाशी/खारघर करिता बसमार्ग क्र.८८२ आणि ठाण्याकरिता बसमार्ग क्रमांक ८८४ सर्च बारवर शोधावे.
२. बसमार्गाची निवड केल्यावर ‘ रिझर्व सिट ’ पर्याय निवडावा.
३. बसमध्ये चढण्याचे आणि उतरण्याचे ठिकाण निवडावे.
४. आपली वेळ निवडून तिकीटाच्या रकमेचे प्रदान करावे.
५. आपली बस ट्रॅक करुन आरक्षित केलेल्या आसनाद्वारे आरामदायक प्रवास करावा.

सर्व प्रवाशांनी या आरामदायक बससेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

१६३५

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

# प्रसिद्धी पत्रक

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दीकरिता सादर
संपादक / वृत्तसंपादक

मसुवराडे ९/९/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.८३
दिनांक :०९.०९.२०२२

## माऊंट मेरी चर्च, वांद्रे, जत्रेदरम्यान बेस्ट बसेसचे प्रवर्तन

मुंबई, ०९ – यावर्षी माऊंट मेरी वांद्रे जत्रेचे दिनांक ११ सप्टेंबर ते १८ सप्टेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. या दिवसांच्या दरम्यान भक्तगण आर्शिवाद घेण्यासाठी माऊंट मेरी चर्चला मोठया प्रमाणात भेट देतात. वांद्रे स्टेशन पश्चिम ते माऊंट मेरी चर्च अशी ये जा करणा-या प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाकडून २६० अतिरिक्त बसेस बसमार्ग क्रमांक २०२ मर्या., ३२१ मर्या., ए-३७५ , ४२२, सी-७१ या मार्गावर चालविण्यात येणार आहेत, या बसगाडया वांद्रे आणि माहिम विभागांशी संलग्न आहेत. या व्यतिरिक्त उपनगरातून वांद्रे स्टेशनकडे येणा-या प्रवाशांसाठी जत्रेच्या कालावधीत ८ दिवस विशेष बससेवा वांद्रे स्टेशन व हिलरोड गार्डनच्या दरम्यान चालविली जाणार आहे. वांद्रे स्टेशन आणि हिलरोड गार्डन येथे विशेष बसेस मोठया प्रमाणात वेळोवेळी उपलब्ध होणार आहे.

बेस्ट उपक्रमातर्फे भक्तगणांना विनंती आहे की, त्यांनी माऊंट मेरी, वांद्रे जत्रेदरम्यान या बससेवेचा अवश्य लाभ घ्यावा.

## BEST Bus operation during Mount Mary Church , Bandra Fair.

Mumbai, 09 - This year the Bandra Fair is scheduled to be held from 11th to 18th September 2022 , during these days large number of devotees visit the Mount Mary Church to seek the blessings. To facilitate transportation of the commuters generated at Bandra Station(West) to & Fro to Mount Mary Church. BEST will be operating 260 extra buses on the routes 202 Ltd,321Ltd, A375,422,C71 connecting Bandra /Mahim, In addition to cater the passengers coming by Suburban Rail at Bandra Station - aspecial feeder service will be operated between Bandra Station and Hill Road Garden during the fair period of eight days. The special buses will be available at Bandra Bus Station and Hill Road Garden at high frequency.

Devotees are requested to avail the bus service available during the Bandra Fair period.

****

Scanned with OKEN Scanner

१६५५५

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192, Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिद्धी करिता सदर

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिद्धी पत्रक क्र.४४
दिनांक : १३.०९.२०२२

**बेस्ट उपक्रमाच्या अनेक वीज ग्राहकांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर येणारे फसवे लघुसंदेश**

मुंबई,१३ - असे आढळून आले आहे की बेस्ट उपक्रमाच्या अनेक वीज ग्राहकांना त्यांच्या भ्रमणध्वनीवर फसवे लघुसंदेश (SMS) प्राप्त होत आहेत. ज्यामध्ये विद्युत पुरवठा खंडित करण्याची धमकी दिली जात आहे आणि दिलेल्या भ्रमणध्वनी नंबरवर कॉल करण्यास सांगत आहेत.पुढे जेव्हा ग्राहक या फसव्या भ्रमणध्वनीवर कॉल करतात तेव्हा त्यांना विशिष्ट ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते आणि नाममात्र रकमेचा व्यवहार ऑनलाइन करण्यास सांगत आहेत. नंतर फसवणूक करणारा सदर वीजग्राहकाचा पासवर्ड/ओटीपी चोरतो. त्यानंतर ग्राहकांकडून त्यांच्या बँक खात्यातून फसवणूक करून पैसे काढल्याच्या तक्रारी येत आहेत.

या संदर्भात बेस्ट आपल्या वीजग्राहकांना कळवू इच्छिते की, बेस्ट उपक्रमाच्या वतीने बिलाबाबतचे लघुसंदेश (SMS) नेहमीच कोणत्याही भ्रमणध्वनीवरून न पाठविता "BESTSM" द्वारेच पाठविले जातात. जर आपणांस वीजबिलाबाबत अथवा वीजपुरवठा खंडीत करण्याबाबतचा लघुसंदेश (SMS) "BESTSM" व्यतिरिक्त एखाद्या कोणत्याही भ्रमणध्वनीवरुन आल्यास तसेच संपर्कासाठी दिलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगितले असल्यास कृपया अशा प्रकारच्या लघुसंदेशांना प्रतिसाद देऊ नका. तुमचा पासवर्ड, ओटीपी पिन चोरण्यासाठी आणि तुमची फसवणूक करण्यासाठी तुम्हाला ऑनलाइन व्यवहार करण्यास सांगणारा हा फसवा लघुसंदेश असू शकतो.

संबंधित प्रभागांसाठी बेस्ट उपक्रमाचे ग्राहक सेवा कॉलिंग क्रमांक बेस्ट उपक्रमाच्या www.bestundertaking.com वेबसाइट वर उपलब्ध आहेत. कोणत्याही मदतीसाठी / मार्गदर्शनासाठी त्यांच्याशी संपर्क साधला जाऊ शकतो.

ग्राहकांना विनंती आहे की अशा कोणत्याही लघुसंदेशाशी व्यवहार करताना सावधगिरी बाळगावी आणि तुमचा पासवर्ड/ओटीपी अशा फसव्या व्यक्तींना देऊ नका व फसवणुक होण्यापासून स्वतःला वाचवा असे आवाहन बेस्ट उपक्रमाच्या वतीने करण्यात येत आहे.

आतापर्यंत बेस्ट उपक्रमाकडून ९ वेगवेगळ्या भ्रमणध्वनी क्रमांकांविरुद्ध सायबर गुन्हे शाखेत तक्रारी करण्यात आलेल्या आहेत.

----

Scanned with OKEN Scanner

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

मनुवराडे १५/९/२०२२
(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

---

प्रसिध्दी पत्रक क्र.४५
दिनांक :.१५.०९.२०२२

बेस्टच्या चलो मोबाईल ॲप / स्मार्ट कार्ड / एनसीएमसी कार्ड पासधारक
<u>सदस्य होऊन तुमचा प्रवास खर्च ५०% कमी करा</u>

मुंबई, १५ - पूर्वी बेस्ट उपक्रम एका निश्चित स्थळापासून दुस-या निश्चित स्थळापर्यंत मासिक / त्रैमासिक बसपास वितरित करीत होते परंतु, प्रवाशांच्या सोयीकरिता बेस्ट उपक्रमाने बसफे-यांच्या संख्येनुसार बसपास वितरण सेवा सुरु केली आहे. सदर बसपासाचे दर हे बस प्रवासाच्या अंतरानुसार ठरविण्यात येत असल्याने प्रवासी निश्चित कालावधीत निश्चित केलेल्या बसफे-या पूर्ण करु शकतील. अशा प्रकारे फेरीवर आधारित बसपास प्रवाशांना आर्थिकदृष्ट्या फायद्याचे होते आणि त्यामध्ये विविध ठिकाणच्या प्रवासाची लवचिकता देतात. अशा प्रकारच्या बस पासेसचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत.

१. पाच किलोमीटरपर्यंतच्या दैनंदिन प्रवासासाठी दहा रुपये तिकीट दर आहे. (रुपये ५ प्रति फेरीप्रमाणे ये-जा करणा-या प्रवासासाठी), १०० फे-यांसाठी २८ दिवसांसाठीच्या बसपासचा दर रु.२४९/- असल्याने त्याचा प्रतिफेरी दर रु.२.५० इतका होतो. म्हणजेच प्रत्येकी दोन फे-यांकरिता रु.५/- लागत असल्याने या दैनंदिन प्रवासभाडयात ५०% बचत होते.

२. दहा किलोमीटरपर्यंतच्या दैनंदिन प्रवासासाठी वीस रुपये तिकीट दर आहे. (रुपये १० प्रति फेरीप्रमाणे ये-जा करणा-या प्रवासासाठी), १०० फे-यांसाठी २८ दिवसांसाठीच्या बसपासचा दर रु.४९९/- असल्याने त्याचा प्रतिफेरी दर रु.४.९९ इतका होतो. अशा प्रकारे प्रत्येकी दोन फे-यांकरिता रु.१०/- लागत असल्याने या दैनंदिन प्रवासभाडयात ५०% बचत होते.

... २

Scanned with OKEN Scanner

३. अशाच प्रकारे ५ किलोमीटर अंतरापर्यंतच्या १०० वातानुकूलित बसफे-यांसाठी २८ दिवसांकरिता रुपये २.९९ प्रतिफेरीप्रमाणे तिकीट दर रु.२९९ होतो आणि दहा किलोमीटरच्या अंतरापर्यंतच्या १०० बसफे-यांकरिता रु.६.४९ प्रतिफेरीप्रमाणे रुपये ६४९ प्रमाणे सुपरसेवर बसपास योजेनुसार आकारले जातात. पुन्हा येथे तिकीट दरात ५०% पेक्षा जास्त बचत होते.

४. बेस्ट उपक्रमाच्या संपूर्ण प्रवर्तन क्षेत्रात प्रवास करु इच्छिणा-या प्रवाशांनी उदा.मुंबई उपनगर, मिरा-भाईंदर, ठाणे आणि नवी मुंबई दैनंदिन बसपास रुपये ५०/- (विना वातानुकूलित बस) आणि रु.६०/- (वातानुकूलित बस) यापैकी कोणताही पर्याय निवडू शकतात.

कोणत्याही अडथळ्याविना व आर्थिकदृष्टया फायदेशीर प्रवासासाठी बेस्ट मोबाईल ॲप बसपासचा वापर करावा, अशी बेस्ट उपक्रमातर्फे प्रवाशांना विनंती करण्यात येत आहे.

जास्तीत जास्त मुंबईकरांनी सुरक्षित, पर्यावरणपूरक व आर्थिकदृष्टया फायदेशीर अशा बससेवेचा लाभ घ्यावा, या फेरीवर आधारित बसपास सेवेचा लाभ घेऊन प्रवाशांनी ५०% प्रवास खर्च वाचवावा, असे बेस्टचे महाव्यवस्थापक लोकेश चंद्र यांनी म्हटले आहे.

............

Scanned with OKEN Scanner

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१


कृपया प्रसिद्धीकरिता सादर
संपादक / उपसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिद्धी पत्रक क्रमांक ४६
दिनांक : १९.०९.२०२२

<u>नवरात्रोत्सव,महालक्ष्मी जत्रेदरम्यान बेस्ट बसचे प्रवर्तन</u>

मुंबई १९ - यावर्षी दिनांक २६ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत महालक्ष्मी जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवसात मोठ्या प्रमाणात भाविक देवीच्या दर्शनासाठी महालक्ष्मी मंदिरात येतात. प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमातर्फे महालक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या २८, ३७, ८३, ५७, ए-७७, १५१, ए- १२४ , ए- ३५७ या बसमार्गावर दररोज २६ अतिरिक्त बसगाड्या चालविण्यात येणार आहेत. या व्यतिरिक्त उपनगरीय प्रवाशांसाठी भायखळा तसेच महालक्ष्मी रेल्वे स्थानकाहून महालक्ष्मी मंदिरात जाण्याकरिता गर्दीच्या वेळी विशेष बससेवा या दोन स्थानकांच्या दरम्यान नवरात्र उत्सवाच्या नऊ दिवसांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात चालविण्यात येईल. तसेच जिजामाता उद्यान ( भायखळा - पूर्व ) ते महालक्ष्मी मंदिर मार्गे भायखळा स्थानक ( पूर्व ), आणि महालक्ष्मी स्थानक अशा विशेष बसफेऱ्यांदेखील चालविण्यात येणार आहेत.

तरी भाविकांनी महालक्ष्मी जत्रेदरम्यान उपलब्ध असलेल्या विशेष बससेवेचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमाद्वारे करण्यात येत आहे

**BEST Bus operation during Navratri festival, Mahalaxmi Fair**

Mumbai, 19 - This year Mahalaxmi fair is scheduled to be held from 26th September to 4th October 2022, during Navratri large number of devotees visit Mahalaxmi temple to seek the blessings. To facilitate transportation of the commuters generated towards Mahalaxmi temple, BEST will be operating 26 extra buses daily on routes 28, 37 83, 57, A-77, 151, A-124, A-357, connecting Mahalaxmi Temple. In addition to cater passengers coming by suburban rail at Byculla & Mahalaxmi temple - a special feeder service will be available at high frequency between these two destinations during the Navratri fair of nine days. Special trips will also be operated between Jijamata Udyan (Byculla-E) to Mahalaxmi plying via Byculla, Saatrasta, Mahalaxmi Station.

Devotees are requested to avail the bus service available during the Mahalaxmi fair.

.......

Scanned with OKEN Scanner

**PRESS NOTE**

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

**प्रसिद्धी पत्रक**

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र ४७
दिनांक : २१ ०९ २०२२


## विमान प्रवाशांसाठी बेस्टची अनोखी भेट

मुंबई, २१ - प्रवाशांसाठी नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबविणा-या बेस्ट उपक्रमाने विमान प्रवाशांसाठी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळापासून दक्षिण मुंबई, नवी मुंबई तसेच ठाण्यापर्यंत वातानुकूलित इलेक्ट्रिक बससेवा सुरु केली असून बेस्ट चलो ॲपचा वापर करुन या बससेवेचे आगाऊ तिकीट आरक्षण करण्याची सोय देखील उपलब्ध करुन दिली आहे.

आता विमानप्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ होण्याच्या दृष्टीने बेस्ट उपक्रमाने थेट विमानतळाच्या प्रवेशद्वारापाशीच (Arrival & Departure )बससेवा उपलब्ध करुन देण्याची सुरुवात केली आहे. बेस्ट चलो ॲपद्वारे प्रवासी आसन आरक्षणाबरोबरच प्रवासभाडयाची रक्कम देखील अदा करु शकतात. या एअरपोर्टसेवेच्या बसगाड्यांवरील कार्यरत बसचालकांना प्रवासी कोणत्या बसथांब्यावर बसगाडीच्या प्रतिक्षेत आहे, याची माहिती ॲपद्वारे प्राप्त होते. त्याप्रमाणे बसचालक संबंधित बसथांब्यावर बसगाडी थांबवून प्रवासी बसगाडीत घेऊ शकतात तसेच प्रवासी त्यांच्या “Mobile APP” द्वारे आसन आरक्षित केलेल्या बसगाडीचे ठिकाण स्वतःच्या मोबाईलवर पाहू शकतात. **एअरपोर्ट सेवेची** बसगाडी कोणत्या बसथांब्यावर उपलब्ध होणार आहे, हे प्रवाशांना समजण्याकरीता बेस्ट उपक्रमातर्फे विशिष्ट पध्दतीचे **‘स्टिकर्स’ संबंधित बसथांब्यांवर प्रदर्शित** करण्यात आलेले आहेत.

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरदेशीय आणि आंतरराष्ट्रीय विमानतळाला** जोडणा-या वातानुकूलित बससेवा **२४ X ७ (चोवीस तास)** खालील बसमार्गांवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.




...२...

| अ.क्र. | बसमार्ग | गंतव्यस्थान | | बस थांबे |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १ | एअरपोर्टसेवा-१ (८८१) | बॅकबे आगार | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ | बॅकबे आगार - गेटवे ऑफ इंडिया – वाय बी चव्हाण प्रतिष्ठान (मंत्रालय) - एनसीपीए - विल्सन महाविद्यालय - कंबाला हिल पोस्ट ऑफिस - वत्सलाबाई देसाई चौक (हाजीअली) – नेहरु तारांगण - कलानगर – वाकोला पोलीस ठाणे - आंतरदेशीय विमानतळ जंक्शन - बहार चित्रपटगृह – वेअर हाऊस - छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ |
| या बसमार्गावर किमान प्रवासभाडे रु.५०/- व कमाल प्रवासभाडे रु.१७५/- आहे आणि बसगाड्या एका तासाच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत | | | | |
| २ | एअरपोर्टसेवा-२ (८८२) | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ | जलवायू विहार-खारघर | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ – आंतरदेशीय विमानतळ जंक्शन – वाकोला पोलीस ठाणे - कलानगर – भारतनगर – प्रियदर्शिनी - उमरशी बाप्पा चौक – देवनार आगार – वाशीगांव - वाशी बसस्थानक – नेरुळ क्रिडा संकुल - एनआरआय संकुल (सीवुड) – सीबीडी-बेलापूर (कोकणभवन) – हिरानंदानी (खारघर सेक्टर-७) - जलवायू विहार-खारघर |
| या बसमार्गावर किमान प्रवासभाडे रु.५०/- व कमाल प्रवासभाडे रु.२५०/- आहे आणि बसगाड्या एका तासाच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत. | | | | |
| ३ | एअरपोर्टसेवा-४ (८८४२) | छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ | कॅडबरी जंक्शन - ठाणे | छत्रपती शिवाजी महाराज आंतरदेशीय विमानतळ – वेअर हाऊस - आंतरराष्ट्रीय विमानतळ – डॉ. दत्ता सामंत चौक (साकीनाका) - डॉ. आंबेडकर उद्यान (पवई) - आयआयटी मार्केट - गांधीनगर - जोगेश्वरी-विक्रोळी जोडमार्ग – भांडूपगांव – भांडूप उदंचन केंद्र – मिठागर – मॅरेथॉन चौक (तीनहात नाका) – लुईसवाडी - कॅडबरी जंक्शन-ठाणे |
| या बसमार्गावर किमान प्रवासभाडे रु.५०/- व कमाल प्रवासभाडे रु.१५०./- आहे आणि बसगाड्या एका तासाच्या प्रस्थानांतराने उपलब्ध आहेत. | | | | |

... ३...

सदर बससेवा ही द्रुतगतीची सेवा (Express Service) असून देखील बेस्ट उपक्रमाने इतर वाहनांच्या तुलनेमध्ये अतिशय स्वस्त दरात उपलब्ध करुन दिली आहे.

विमान प्रवाशांव्यतिरिक्त इतर कोणतेही प्रवासी या बसमार्गांवरील कोणत्याही एका स्थानापासून दुसऱ्या स्थानापर्यंत अगाऊ तिकीटाचे आरक्षण करुन प्रवास करु शकतात.

या बससेवेकरिता ॲपद्वारे बसची लाइव्ह ट्रॅकींग करता येणार आहे तसेच या बसच्या प्रवासाकरिता सोबत असलेल्या सामानाकरिता कोणतेही भाडे (No Luggage Fare) आकारण्यात येणार नाही.

या निर्णयामुळे विमान प्रवाशांच्या वाहन शोधण्याची कटकट संपुष्टात येऊन त्यांना विमानतळाच्या प्रवेशद्वारापाशीच वातानुकूलित इलेक्ट्रिक बससेवा उपलब्ध होणार असून घरापासून विमानतळापर्यंत किंवा विमानतळापासून घरापर्यंतचा प्रवास अतिशय सुलभ होणार आहे.

म्हणूनच सर्व प्रवाशांनी या किफायतशीर आणि अनोख्या बससेवेचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

.......

Scanned with OKEN Scanner

9234

# PRESS NOTE

THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

कृपया प्रसिध्दी करिता सादर

संपादक / वृत्तसंपादक

(मनोज वराडे)
जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र.४८
दिनांक :.२३.०९.२०२२

नवरात्रौत्सवादरम्यान बेस्टच्या 'हो-हो' बसचे प्रवर्तन

मुंबई, २३- नवरात्रौत्सवादरम्यान शहरात रात्रीच्या वेळेत गरबा व देवी दर्शनासाठी जाणा-या नागरिकांसाठी बेस्ट उपक्रमाद्वारे शहरात खुली दुमजली आणि वातानुकूलित हो-हो एकमजली बससेवा दिनांक २६ सप्टेंबर ते दिनांक ४ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत सायंकाळपासून ते मध्यरात्रीपर्यंत किंवा वाहतूक बंद होईपर्यंत चालविली जाणार आहे.

हॉप ऑन -- हॉप ऑफ ही खुली दुमजली बससेवा गेट वे ऑफ इंडिया आणि जुहू बीच दरम्यान मार्गे महर्षि कर्वे रोड, ताडदेव, हाजीअली, वरळी सी फेस, बांद्रा एस.व्ही.रोड, लिंकिंग रोड, जुहू तारा रोड ते जुहू बीच या मार्गावर चालविण्यात येणार आहेत.

वातानुकूलित बसेसचा दुसरा मार्ग जुहू बीच आणि गोराई आगार दरम्यान मार्गे जुहू बस स्थानक, मिठीबाई कॉलेज, जे.व्ही.पी.डी., न्यू लिंक रोड, मीठ चौकी, ऑर्लेम चर्च, एस.व्ही.रोड, बोरीवली स्थानक ते गोराई आगार असा चालविण्यात येणार आहे.

नवरात्रौत्सवाच्या कालावधीदरम्यान खुल्या दुमजली बससेवेचे प्रवासभाडे रुपये १५०/- आणि वातानुकूलित एकमजली बससेवेचे प्रवासभाडे रुपये ६०/- असेल.

तरी सर्व भाविकांनी या बससेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमाकडून करण्यात येत आहे.

## BEST HO -HO BUS OPERATION DURING NAVRATRI FESTIVAL

**Mumbai, 23 -- During the Navratri Festival, to facilitate night revelers moving around the city for Garba and Devi Darshan, BEST will be operating additional services of Open Deck in city and AC buses for the citizens from 26th September to 4th October 2022 in evening hours till midnight or till traffic ceases.**

**Hop On -- Hop Off in Open Deck buses will be operated between Gate Way of India and Juhu Beach via Maharshi Karve Road, Tardeo, Haji Ali, Worli Sea Face, Bandra S.V.Road, Linking Road, Juhu Tara Road to Juhu Beach.**

**Second route of AC buses will be operated between Juhu Beach and Gorai Depot via Juhu Bus Station, Mithibai College, J.V.P.D., New Link Road, Mithchowkey, Orlem Church, S.V.Road, Borivli Station, Gorai Depot.**

**The Bus fare for open deck service will be Rs.150/- and for AC bus the fare will be Rs.60/- during Navratri Festival period.**

**All devotees are requested to avail the facility of these Bus Service.**

=====

Scanned with OKEN Scanner

१८५५ वृ.

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिद्धीसाठी सादर

मसुरकरोडे
२४/९/२०२२
जनता संपर्क अधिकारी

**PRESS NOTE**
THE BRIHAN MUMBAI
ELECTRIC SUPPLY &
TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१.

प्रसिद्धी पत्रक क्र. ५९
दिनांक - २४/९/२०२२

बेस्ट उपक्रमाकडून मुंबईकरांना दसऱ्यानिमित्त फक्त १९ रुपयात कोणत्याही बसमार्गावर १० फेऱ्यांची सुपर सेवर ऑफर

मुंबई २५ - डिजिटल बस प्रवासाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीकोनातून नवरात्राच्या पूर्वसंध्येला बेस्ट उपक्रमाकडून विशेष दसरा ऑफरची घोषणा करण्यात आली आहे. केवळ १९ रुपये भरून खरेदी केलेली सदर ऑफर खरेदी दिनांकापासून ९ दिवसांकरिता वैध असून याद्वारे प्रवाशांना १० प्रवास फेऱ्यांचा लाभ मिळणार आहे. नव्या आणि जुन्या "बेस्ट चलो ॲप" धारकांना या सुविधेचा केवळ एकदाच लाभ घेता येणार असून अधिकाधिक मुंबईकर प्रवाशांनी सुलभ अशा डिजिटल प्रवासाचा लाभ घ्यावा, या उद्देशाने सदर ऑफर देण्यात आली आहे.

ऑफर कशी मिळवावी? -

बेस्ट चलो ॲप डाऊनलोड करून बस पास सेक्शनमध्ये जाऊन "दसरा ऑफर" निवडावी. तुमचा तपशील भरून १९ रुपयांचे ऑनलाईन प्रदान करावे. (युपीआय, डेबिट/क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग द्वारे) प्लान खरेदी करावा.

बसमध्ये चढल्यावर "स्टार्ट अ ट्रिप" वर टॅप करून मोबाईल फोन बस वाहकाच्या मशीनजवळ धरून तिकीट वैध करावे. त्यानंतर तुम्हाला प्रवासासाठी डिजिटल पावती ॲपवर मिळेल. संपूर्ण प्रक्रिया रोख रक्कम विरहित आणि कागद विरहित असेल.

सदर योजना २६/९/२०२२ ते ५/१०/२०२२ या कालावधीमध्ये विक्रीकरिता उपलब्ध आहे.

योजनेचे लाभ -

सदर योजनेद्वारे तुम्ही कोणत्याही बस मार्गावर ९ दिवसांच्या कालावधीदरम्यान विमानतळ, हॉप ऑन-हॉप ऑफ अशा विशेष

...(२)

Scanned with OKEN Scanner

(ब)

समवेत नकळता वातानुकूलित आणि विना वातानुकूलित बसगाड्यांद्वारे प्रवास करू शकता.

बेस्ट उपक्रम डिजिटल सेवेत अ ?

संपूर्ण देशभरात तंत्रज्ञानावर आधारित सार्वजनिक परिवहन उपक्रमांमध्ये बेस्ट उपक्रमाने आपले अग्रगण्य स्थान बळकट केले आहे. फक्त ३० लाख प्रवाशांनी बेस्ट चलो ॲप डाऊनलोड केले आहे आणि २५ लाखांपेक्षा अधिक प्रवासी त्यांच्या रोजच्या प्रवासासाठी त्या ॲपचा वापर करतात. त्यामुळे प्रत्येक डिजिटल फेरीद्वारे त्यांचा प्रवास सुलभ, सुरक्षा पैशांच्या कटकटीविना आणि कागदी तिकिटांच्या मुक्ततेला सुकर होतो.

ॲप आणि कार्डच्या डिजिटल सेवेमुळे अधिकाधिक प्रवासी बेस्टकडे आकर्षित होत असून अलीकडच्या सर्वेक्षणात असे दिसून आले की, कोविड पूर्व काळातील आधीच्या कित्येक वर्षांपेक्षा बेस्टच्या दैनंदिन प्रवाशांच्या संख्येत ८ लाखांनी वाढ झाली असून सध्या बेस्टचे फक्त दैनंदिन प्रवासी ३५ लाखांपर्यंत पोहोचले आहेत.

यापूर्वी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने बेस्ट उपक्रमाने ९ रुपयात आझादी योजना, गणेशोत्सवादरम्यान गणेशोत्सव योजना मुंबईकरांच्या सेवेत आणल्या होत्या आणि मुंबईकरांनी त्याला उदंड प्रतिसाद देत ८ लाखांपेक्षा जास्त डिजिटल बसफेऱ्यांचा अनुभव घेतला आहे.

तरी या दसरा ऑफरच्या देखील अधिकाधिक लाभ मुंबईकर जनतेने घ्यावा, असे आवाहन बेस्ट उपक्रमातर्फे करण्यात येत आहे.

---x---

PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट

प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र. १९२,
मुंबई - ४०० ००१

संपादक / वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर

(सुरेश गायकवाड)
उप जनता संपर्क अधिकारी

प्रसिध्दी पत्रक क्र. ५०
दिनांक : २८.०९.२०२२

बसरांग आश्रयस्थानांचे नुतनीकरण आणि पुनर्बांधणी

मुंबई २८- बसरांग आश्रयस्थाने - १०० दिवसांत नुतनीकरण आणि विस्तारित सुखद प्रवासानुभव योजना

अ) प्रायोगिक तत्वावर बसरांग आश्रयस्थानांची पुनर्बांधणी - बेस्ट उपक्रमाच्या वतीने मुंबईतील १० सुशोभित ठिकाणी प्रवाशांना फिरण्यायोग्य अशा नविन बसरांग आश्रयस्थानांची पुनर्बांधणी करणार असून या ठिकाणी खालील सुविधा पुरविण्यात येणार आहेत -

- सीसीटीव्ही कॅमेरा
- दिव्यांग नागरिकांसाठी सांकेतिक ब्रेल / सुचालन फलक
- वाहतुकीकडे झुकणाऱ्या आसनव्यवस्थेसह आधुनिक सरचना
- घसरणमुक्त व स्पर्शाने जाणविणारी जमीन
- रुंद बसरांग मार्गिका
- सार्वजनिक शेअरिंग सायकलची सुविधा
- अद्ययावत उपकरण प्रभारण ( चार्जिंग ) व्यवस्था
- वाय - फाय
- बस आगमन निर्देशक रंगीत छत
- आरामदायक वातावरणासाठी प्रायोगिक क्षेत्रात धुके शीतकरण प्रणाली
- एसओएस पॅनिक बटन
- केंद्रनियंत्रित सार्वजनिक माहितीसाठी तसेच, पोडकास्ट व थीम आधारित संगीत साठी ध्वनिक्षेपक यंत्रणा.
- वाचनालय / इ वाचनालय

Scanned with OKEN Scanner

- ३६० अंशातील दृश्यमानतेसाठी कडक आणि अखंड काचेचे पटल.
- प्रशमोपचार पेटी

ब) **२०० बसरांग आश्रय स्थानकांचे नूतनीकरण** :

नव्या रचनेसहित प्रवाशांच्या सेवेसाठी सुमारे २०० बसरांग आश्रय स्थानकांचे सौंदर्य - पूरक व नव्या रचनेसहित नुतनीकरण / सुधारीकरण करण्यात येणार आहेत.

क) **५० डिजिटल बसरांग आश्रय स्थानकांचे नूतनीकरण / बांधणी** : शासनाच्या डिजिटल भारत व्हिजननुसार ५० डिजिटल बसरांग आश्रय स्थानकांची सौंदर्य - वर्धक व खांबावर लावलेल्या माहितीदर्शक फलकांसह पुनर्बांधणी करण्यात येईल , ज्यायोगे प्रवाशांना एकसंघतेची आणीव होवून त्यासोबत नागरिकांना आवश्यक माहिती व सुचनांचेही आदान प्रदान होईल.

वरील बसरांग आश्रयस्थानाच्या अंमलबजावणी नंतर - ३०० दिवसांत नुतनीकरण आणि विस्तारित सुखद प्रवासानुभव योजना

अ) **२०० डिजिटल बसरांग आश्रय स्थानकांचे नूतनीकरण / बांधणी** : शासनाच्या डिजिटल भारत व्हिजननुसार २०० डिजिटल बसरांग आश्रय स्थानकांची सौंदर्य - वर्धक व खांबावर लावलेल्या माहितीदर्शक फलकांसह पुनर्बांधणी करण्यात येईल.

ब ) **१००० बसरांग आश्रय स्थानकांचे नूतनीकरण** : नव्या रचनेसहित प्रवाशांच्या सेवेसाठी सुमारे १००० बसरांग आश्रय स्थानकांचे सौंदर्य - पूरक व नव्या रचनेसहित नुतनीकरण / सुधारीकरण करण्यात येणार आहे.

क ) **सीएसआर धोरणाअंतर्गत दत्तक योजना** : सदर योजनेनुसार ५० डिजिटल बसरांग आश्रय स्थानकांचे सामुदायिक दत्तक धोरणानुसार नूतनीकरण हाती घेतले जाईल.

-----------

Scanned with OKEN Scanner